(४)

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई

## गुरुवार दि.२१ /०५/ २००४ रोजी झालेल्या ९९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ९९ वी बैठक शुक्रवार दि.२१/०५/००४ रोजी दुपारी ३.०० वाजता गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृह येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.आमदार श्री.सचिन भाऊ अहिर | सभापती |
| २. | श्री.सुरेश कारंडे | मुख्य अधिकारी |
| ३. | करनिर्धारक व संकलक, म.न.पा. यांचे प्रतिनीधी | निमंत्रक |

मा. सभापती हयांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्गाचे स्वागत करुन बैठकीच्या कामकाजास सुरुवात करण्याच्या सूचना सचिवांना दिल्या. त्यानुसार सचिव हयांनी मा. सभापती, सन्मा. सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्गाचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली.

मा. सभापती हयांनी सुरुवातीस असे प्रतिपादन केले की, मंडळावर नियुक्त केलेल्या सदस्यांचा कार्यकाळ संपुष्टात आलेला आहे. त्यांना अद्याप मुदतवाढ देण्यात आलेली नाही असे समजते. मुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळावर नियुक्त केलेले एकूण १६ सन्मा. सदस्य असून त्यापैकी ११ सन्मा. सदस्यांचा कार्यकाळ संपुष्टात आलेला आहे. हया ११ सन्मा. सदस्यांच्या कार्यकाळस मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सन्मा. सदस्य श्री. कमरुद्दीन मर्चंट हे सद्यः मंडळामध्ये कार्यरत आहेत परंतु त्यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकत नाहीत असे त्यांनी कळविले असून सदर बैठकीस गैरहजर राहण्याची विनंती केली आहे. अशा परिस्थितीत मंडळाची बैठक घेण्यात यावी किंवा कसे हयाबाबत विधी सल्लागार/प्राधिकरण यांना विचारले असता त्यांनी असे मत प्रदर्शित केले की, मंडळ सद्यः अस्तित्वात आहे व मंडळावर सद्यः जे एकूण सन्मा. सदस्य कार्यरत आहेत त्यांच्या संस्थेच्या गणपूर्तीनुसार बैठक घेण्यास हरकत नाही.

मुख्य अधिकारीं हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सद्यः ६ सन्मा. सदस्य मंडळावर कार्यरत असून कायदेशीर तरतुदीनुसार जर १/३ सदस्य (२ सन्मा. सदस्य ) बैठकीस हजर असतील तर बैठक घेण्यास हरकत नसावी.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबत काही तांत्रिक अडचणी दिसून येत नाहीत. हयाबाबत शासनाने आपणांस काही कळविले आहे काय अशी विचारणा मा. सभापती यांनी केली.

मुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, शासनाकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार निवडणुक आचारसंहितेच्या कालावधीत पावसाळापूर्व दुरुस्ती व पुनर्रचनेची कामे तात्काळ होण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे मंजूरी/नामंजूरी देण्यात यावी. हयाकरिता निवडणुकांशी संबंधित अशासकीय तसेच इतर अशासकीय सदस्य वगळता मंडळाची बैठक उपसभापती हयांच्या अध्यक्षतेखाली शासकीय सदस्य, अधिकारी हयांच्या समवेत आयोजित करण्यास हरकत नाही. सदर आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या (निवडणुक शाखा) हयांच्या संमतीने पारीत करण्यात आले आहेत.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, शासनाचे वरील आदेश हे निवडणुकीच्या काळापुरते मर्यादित आहेत. त्यामुळे आजच्या बैठकीच्या गणपूर्तीच्या अनुषंगाने शासनाकडून काही आदेश प्राप्त झाले आहेत.का ? हयाबाबत विधी सल्लागार/प्रा. यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी मंडळाची बैठक घेण्यास हरकत नाही असे मत प्रदर्शित केले आहे. परंतु हयाबाबत विधी विभागाकडून लेखी अभिप्राय घेण्यात आले आहेत काय ? मुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबत विधी विभागाकडून लेखी अभिप्राय घेण्यात आलेले नाहीत. मात्र विधी सल्लागार / प्रा. यांच्याशी व्यक्तीशः केलेल्या चर्चेत त्यांनी मंडळाची बैठक घेण्यास हरकत नाही असे मत प्रदर्शित केले आहे.

याबाबत मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, यापूर्वीची ९८ वी बैठक दि. १६.२.२००४ रोजी म्हणजे तीन महिन्यांपूर्वी झालेली आहे. आचारसंहितेमुळे बरीच कामे मंजूर करता आलेली नाहीत. त्यानंतर जून्या इमारतींचे मान्सूनपूर्व सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. त्यामुळे पावसाळयातील संभाव्य पडझडी व अपघात टाळण्याच्या दृष्टीने ही बैठक फार महत्वाची आहे व तांतडीने घेणे आवश्यक आहे. त्यामुळे या बैठकीमध्ये सादर केलेली सर्वप्रकारची दुरुस्तीची अंदाजपत्रके, पुनर्बांधणीच्या कामाचे प्रस्ताव व पुनर्विकासाचे प्रस्ताव पुढील बैठकीत स्थायी करण्याची वाट न पाहता मंजूर करण्यात यावीत. त्यामुळे गेल्या तीन महिन्यात आलेली कामे तात्काळ पावसाळयापूर्वी हाती घेणे शक्य होईल व पावसाळयापूर्वी जून्या इमारतीतील भाडेकरुंना पर्यायी जागेत/संक्रमण शिबीरात हलविणे सोपे होईल.

<u>बाब क्रमांक : ९९ / १</u>

विषय- दि. १६.०२. २००४ रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या
९८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

---

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ५१ वर सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

-----------------------oXoXo---------------

बाब क्रमांक : ९९ / २

विषय- नियंत्रण कक्षात प्राप्त झालेल्या संदेशाची माहिती.
(कालावधी दि. ६.०२.२००४ ते १८.०५.२००४)

सदर माहिती पृ.क्र.५३ ते ५५ वर माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

सदर माहितीची नोंद घेण्यात आली.

----------------------------oooo---------------------------

बाब क्रमांक : ९९.३ (अ)

विषय- सन २००४ मधील धोकादायक इमारतींची सद्यस्थिती.

सदर माहिती पृ.क्र.५७ ते ५९ वर माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

सदर माहितीच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द) हयांनी असे प्रतिपादन केले की, सन २००४ च्या पावसाळापूर्व सर्वेक्षणत दक्षिण परिमंडळात एकूण ९ इमारती " धोकादायक इमारती " म्हाणून घोषित केल्या असून त्यांची सद्यःस्थिती पृ.क्र.५७ ते ५९ वर सादर करण्यात आली आहे. हया इमारतींमध्ये एकूण ३१९ निवासी + १११ अनिवासी = ४३० असून भाडेकरु/रहिवाशी ६५ भाडेकरु/रहिवाशांनी त्यांचे गाळे खाली केले आहेत. हया इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावणे, धोकादायक भाग पाडणे, रहिवाशांची पर्यायी व्यवस्था करुन इमारती खाली करुन घेणे, इमारतीची आवश्यकतेनुसार दुरुस्ती व पुनर्रचना करणे इत्यादी कार्यवाही युध्दपातळीवर सुरु करण्यात आलेली आहे. सर्व धोकादायक इमारतींवर इमारतीच्या धोक्याविषयीचे फलक लावण्यात आले आहेत.

सदर माहितीची नोंद सर्व सन्मा. सदस्यांनी घेतली.

--------------------oXXo--------------------

<u>बाब क्रमांक : ९८.३ (ब)</u>

विषय- दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

---

सदर प्रस्ताव पृ.क्र.६१ ते १९३ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता / दक्षिण विभाग हयांनी असे प्रतिपादन केले की, दक्षिण परिमंडळातील अ. विभागातील ३, ब. विभागातील १२, सी १-२ विभागातील १२, सी ३-४ विभागातील ९, डी-१ विभागातील १० व डी-२ विभागातील ९ अशा एकूण ५५ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील एकूण ५५ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ९९/८०१**

**दक्षिण परिमंडळातील एकूण ५५ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

-----------ooo------------

<u>बाब क्रमांक : ९८.४ (अ)</u>

विषय- उत्तर परिमंडळातील फग-द विभागातील मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या खर्चाकरिता सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

...................

सदर माहिती पृ.क्र.१९५ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (दक्षिण) यांनी असे प्रतिपादन केले की, फग-द विभागातील उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या खर्चास मंडळाच्या दि. १७.११.२००३ रोजीच्या बैठकीत रु. ६ लक्ष रक्कमेस प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे.

परंतु प्रत्यक्ष खर्च हा सुमारे २५ टक्क्यांनी वाढणार असल्याने सुधारित प्रशासकीय मंजूरीची आवश्यकता आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर खर्चास सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ९९/८०२**

**फग-द विभागातील मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या व धोकादायक भाग पाडण्याच्या कामाच्या रु. ७.५० लक्ष खर्चास सुधारित प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

-------------------------------------oo-----------------------------

बाब क्रमांक : ९९.४ (ब)

विषय- उत्तर परिमंडळातील संरचनात्मक दुरुस्ती कामांसाठी दहा टक्क्यापेक्षा अधिक दराने प्राप्त झालेल्या निविदांचे देकार वाटाघाटीने निश्चित करणे व निविदा स्विकारण्यास मंडळाची मान्यता मिळणेबाबत.

-------------------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.१९७ ते १९९ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी असे प्रतिपादन केले की, उत्तर परिमंडळातील पृ.क्र.१९९ वर सादर केलेल्या इमारतींच्या दुरुस्मती कामांच्या ज्या निविदा प्राप्त झाल्या आहेत त्यामध्ये निविदाधारकांनी निविदांची टक्केवारी जवळजवळ १४.९८ टक्के अधिक दरापर्यंत भरलेली आहे. हया निविदांची टक्केवारी १० टक्केपेक्षा अधिक असल्याने त्याबाबतच्या वाटाघाटी करणे किंवा निविदा स्विकृत करण्याचे अधिकार मुख्य अभियंता / प्राधिकरण यांना आहेत. मुख्य अभियंता / प्राधिकरण यांनी संबंधित निविदाधारकांबरोबर केलेल्या वाटाघाटीत त्यांच्या निविदांचे दर ९.९९ ते ९.९५ टक्केपर्यंत कमी केले आहेत. प्राधिकरणाने दि. २६.११.२००२ रोजी पारीत केलेल्या ठरावानुसार वाटाघाटी केलेल्या निविदा हया सक्षम प्राधिका-याच्या वरिष्ठ पातळीवर स्विकृत करणे आवश्यक आहे. हया निविदा मुख्य अभियंता स्विकृत करीत नसल्याने मंडळाने स्विकृत करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर ३ कामांच्या निविदा वाटाघाटी करुन स्विकृत करण्यास मंडळाची परवानगी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर ३ कामांच्या निविदा वाटाघाटी करुन स्विकृत करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**<u>ठराव क्रमांक : ९९ / ८०३</u>**

उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे खालील ३ कामांच्या निविदा वाटाघाटी करुन स्विकृत करण्यास मंजूरी देण्यात आली.

१) इ.क्र.१८, गणपती भुवन, जे.एम. स्ट्रीट, परेल, मुंबई

२) इ.क्र.३-३एफ, श्री बिल्डिंग, रानडे रोड, दादर, मुंबई

३) इ.क्र.१६०-१६८, एम.एस.अली रोड, मुंबई

---

<u>बाब क्रमांक : ९९.४ (क)</u>

विषय- इ.क्र.२९९अ/ब, बोटावाला चाळ, आर.बी.मार्ग, माझगाव
सुधारित भाडेकरु/रहिवाशांची यादी मंजूर करणेबाबत.

---

सदर प्रस्ताव पृ.क्र.२०१ ते २२५ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी असे प्रतिपादन केले की, ही इमारत ८८ (३)(अ) प्रमाणपत्रातर्गत घोषित करण्यास मंडळाने अगोदरच मंजूरी दिलेली आहे. मात्र त्यावेळी भाडेकरु/रहिवाशांनी त्यांच्या भाडेकरु/रहिवाशी हक्काची कागदपत्रे सादर न केल्याने भाडेकरु/रहिवाशांची यादी ~~चिरिचल~~ अर्धवट होती. आता भाडेकरु/रहिवाशांनी सादर केलेल्या कागदपत्रांनुसार भाडेकरु/रहिवाशाची यादी सुधारित करण्यात आली असून त्यास मंडळाची मंजूरी आवश्यक आहे. हया इमारतींची संयुक्त पुनर्बांधणी योजना राबविण्यसाठी करावयाच्या भूसंपादनाच्या प्रस्तावास शासनाने दि. २५.११.२००३ रोजी मंजूरी दिलेली आहे.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, हया इमारतीतील रहिवाशांना संक्रमण शिबीरातील गाळे देण्याबाबतची सद्यसिती काय आहे ?

तदनुषंगाने श्री. सातले, उ.अ./ ई. विभाग यांनी असे प्रतिपादन केले की, आतापर्यंत आपण ४० भाडेकरु/रहिवाशांना संक्रमण शिबीरात गाळे दिले असून उर्वरित भाडेकरु/रहिवाशी जसजशी कागदपत्रे सादर करीत आहेत तसतसे त्यांना संक्रमण शिबीरात गाळे देण्याची कार्यवाही सुरु आहे.

सविस्तर चर्चेअंती भाडेकरु/रहिवाशांच्या सुधारित यादीस मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**<u>ठराव क्रमांक : ९९/८०४</u>**

उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे इ.क्र.२९९अ/ब बोटावाला चाळ या इमारतीतील भाडेकरु/रहिवाशांच्या सुधारित यादीस सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

---

<u>बाब क्रमांक : ९९.४ (ड)</u>

विषय- इ.क्र.१६, वकिल चाळ, फितवाला रोड, एलफिन्स्टन हया इमारतीला म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) नुसार प्रमाणपत्र देण्याबाबतचा प्रस्ताव.

---

सदर प्रस्ताव पृ.क्र.२२७ ते २३७ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी असे प्रतिपादन केले की, ही इमारत " धोकादायक इमारत " म्हणून घोषित करण्यात आलेली आहे. हया इमारतीचाा समोरील भाग पाडावा लागला आहे. हया इमारतीच्या बाजूला असलेली इ.क्र.१८ ही अगोदरच म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) नुसार प्रमाणपत्रान्वये घोषित करण्यात आलेली आहे. हया दोन्ही इमारतींची संयुक्त पुनर्बांधणी योजना हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर इमारत म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) नुसार प्रमाणपत्रान्वये घोषित करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ९९/८०५**

**प्रस्तावित केल्याप्रमाणे इ.क्र.१६, वकिल चाळ, फितवाला रोड, एलफिन्स्टन हया इमारतीस म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (अ) नुसार प्रमाणपत्र जारी करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.**

---------------------ooooo---------------------

<u>बाब क्रमांक : ९९.४ (ई)</u>

विषय- सन २००४ च्या पावसाळापूर्व सर्वेक्षणात आढळलेल्या उत्तर परिमंडळातील धोकादायक इमारती.

---

सदर माहिती पृ.क्र.२३५ ते २३७ वर माहितीसाठी सादर करण्यात आली आहे.

उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सन २००४ च्या पावसाळापूर्व सर्वेक्षणात उत्तर परिमंडळात एकूण २२ इमारती **धोकादायक इमारती म्हणून** घोषित केलेल्या आहेत. हया इमारतींमध्ये ५७० निवासी + ७० अनिवासी = ६४० भाडेकरु/रहिवाशी असून त्यापैकी २६० रहिवाशांच्या जागा खाली करुन घेणे आवश्यक आहे. १३ रहिवाशांनी जागा खाली केलेल्या आहेत. एकूण १९१ भाडेकरु/रहिवाशांना जागा खाली करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

हया इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावणे, धोकादायक भाग पाडणे, रहिवाशांची पर्यायी व्यवस्था करणे, आवश्यकतेनुसार इमारतींची दुरुस्ती/पुनर्रचना करणे इत्यादी कार्यवाही युध्दपातळीवर सुरु आहे. इमारतीच्या धोक्याविषयीची कल्पना देणारे फलक हया इमारतींवर लावण्यात आले आहेत. दोन ते तीन इमारती पाडूनही टाकण्यात आल्या आहेत.

मुख्य अधिकारी हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, हया इमारतीतील किती रहिवाशांना संक्रमण शिबीरात हलवावे लागणार आहे. उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, एकूण २५४-२६० रहिवाशांना संक्रमण शिबीरात हलवावे लागणार आहे. मुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने संक्रमण शिबीरातील अधिका-यांना असे आदेश दिले की, हया इमारतीतील रहिवाशांची संक्रमण शिबीरात व्यवस्था करण्याच्या दृष्टीने तात्काळ कार्यवाही करावी.

सविस्तर चर्चेअंती वरील माहितीची नोंद सर्व सन्मा. सदस्यांनी घेतली.

---------------------------ooo---------------------------

<u>बाब क्रमांक : ९९.४ (फ)</u>

विषय- उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

----------------------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.२३९ ते ३७१ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी असे प्रतिपादन केले की, उत्तर परिमंडळातील ई. विभागातील १४, फ्ग/द विभागातील १२ व फ्ग/ऊ विभागातील २३ अशा एकूण ४९ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

सविस्तर चर्चेअंती उत्तर मंडळातील एकूण ४९ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

<u>ठराव क्रमांक : ९९ / ८०६</u>

**उत्तर परिमंडळातील एकूण ४९ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ / सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

-----------------xxxx----------------

बाब क्रमांक : ९९.५

विषय- म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम १०३ (बी) नुसार नियोजित सह.गृह.नि. संस्थांचे मालकी हक्क हस्तांतरणाचे प्रस्ताव भू-संपादनाच्या मंजूरीसाठी शासनाकडे सादर करण्यास मंजूरी देण्याबाबत.

१) न्यू तंबाखूवाला बिल्डिंग नं. ६८, खाडीलकर रोड, न्यू तंबाखूवाला स.गृ.नि.संस्था (नि.) चा प्रस्ताव,

२) सारंग हाऊस, वेलबेदर रोड, माझगाव, मुंबई सारंग हाऊस स.गृ.नि.संस्था (नि) चा प्रस्ताव.

------------------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.३७३ ते ३८३ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, न्यू तंबाखूवाला बिल्डिंग हया इमारतीच्या रहिवाशांनी मा. अध्यक्ष/ प्राधिकरण हयांच्याशी नुकतीच चर्चा केली असून हया प्रस्तावास सद्यः स्थगिती देण्याचे आदेश दिले आहेत. मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे आदेश दिले की, हया इमारतीचा प्रस्ताव वगळून सारंग हाऊस सद्यः वगळण्यात यावा.

मा. सभापती हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, कलम १०३ (ब) खालील प्रस्तावांना मंजूरी देण्यापूर्वी संबंधित इमारतीतील रहिवाशांना स्पष्ट कल्पना देण्यात यावी की, त्यांचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर इमारतीची देखभाल, दुरुस्ती/पुनर्रचना त्यांनी स्वखर्चाने करावयाची आहे. मंडळ भविष्यात त्यांच्या इमारतीची दुरुस्ती/पुनर्रचना करणार नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय जेव्हा केव्हा होईल तेव्हा होईल परंतु तोपर्यंत त्यांना मंडळाच्या व त्यांच्या भूमिकेची स्पष्ट कल्पना देण्यात यावी.

सविस्तर चर्चेअंती न्यू तंबाखूवाला बिल्डिंग हया इमारतीचा प्रस्ताव वगळून सारंग हाऊस, माझगांव हया इमारतीचा प्रस्ताव भूसंपादनाच्या मंजूरीसाठी शासनाकडे सादर करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानंमते ठरले.

**ठराव क्रमांक : ९९/८०७**

**सारंग हाऊस, वेलबेदर रोड, माझगाव, मुंबई या इमारतीचा कलम १०३ (ब) खालील प्रस्ताव भूसंपादनाच्या मंजूरीसाठी शासनास सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.**

----------------------------oooo----------------------------

बाब क्रमांक : ९९.६ (अ) (१)(२)(३)

विषय- पुनर्रचित इमारतींच्या नामांकन प्रस्तावास मंजूरी देण्याचे प्रस्ताव.

१) इ.क्र.८९-९१, दुर्गादेवी व १-१९, पठाण स्ट्रीट, सी. विभाग, मुंबई-- **माता दुर्गादेवी**

२) ४९, ४९,ए, मुसा चाळ, ५१-५३, माळी चाळ, के.के.मार्ग, सातरस्ता, मुंबई-- **गायत्री सदन**

३) इ.क्र.८९-९१, कामाठीपूरा, ३री गल्ली, ई. विभाग, मुंबई-- **आकाश सदन**

-----------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.३८५ ते ३८९ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र) यांनी असे प्रतिपादन केले की, हया तीन इमारतीतील रहिवाशांनी सुचविल्यानुसार हया इमारतींस नावे देण्याचे प्रस्ताव मंडळापुढे मंजूरीसाठी सादर के आहेत. तसेच आयत्या वेळच्या विषयात मानाजी राजूजी चाळ, १,२,३ प्रभादेवी रोड हया इमारतीस " सुखसागर " हे नाव देण्याचा रहिवाशांचा प्रस्ताव सादर केला आहे. इ.क्र.४०६-४१२, पारशीवाडी चाळ हया इमारतीस रहिवाशांनी " अथर्व " हे नाव देण्याचे प्रस्तावित कली आहे व इ.क्र.७-९-११-२४डी, फितवाला रोड हया पुनर्रचित इमारतीस " सदगुरु दर्शन " हे नाव रहिवाशांनी सुचविले आहे.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, ५, फितवाला रोड हया इमारतीच्या पुनर्रचनेची सद्यःस्थिती काय आहे. तदनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र) यांनी असे प्रतिपादन केले की, सदर मालमत्ता मंडळाकडे विहित झाली असून अंतिम अधिसूचना अद्याप काढलेली नाही.

सविस्तर चर्चेअंती रहिवाशांनी सुचविल्यानुसार हया ६ पुनर्रचित इमारतींना नावे देण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ९९/८०८**

**खालील ६ पुनर्रचित इमारतींना खालीलप्रमाणे नावे देण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.**

| अ.क्र. | इमारतीचा तपशील | पुनर्रचित इमारतीचे नाव |
|---|---|---|
| १. | इ.क्र.८९-९१, दुर्गादेवी व १-१९, पठाण स्ट्रीट, सी. विभाग, मुंबई. | माता दुर्गादेवी |
| २. | ४९, ४९,ए, मुसा चाळ, ५१-५३, माळी चाळ, के.के.मार्ग,सातरस्ता, मुंबइ | गायत्री सदन |
| ३. | इ.क्र.८९-९१, कामाठीपूरा, ३री गल्ली, ई. विभाग,मुंबई | आकाश सदन |

| | | |
|---|---|---|
| ४. | मानाजी राजूजी चाळ, १,२,३ प्रभादेवी रोड मुंबई. | सुखसागर |
| ५. | इ.क्र.४०६-४१२, पारशीवाडी चाळ | अथर्व |
| ६. | इ.क्र.७-९-११-२४डी, फितवाला रोड हया पुनर्रचित इमारतीस | सदगुरु दर्शन |

----------------------------००ऋऋ००----------------------

बाब क्रमांक : ९९.६ (ब) ✓

विषय- इ.क्र.१६ जी ते के, नौशिर भरुचा मार्ग हया संयुक्त पुनर्बांधणी योजनेतील इ.क्र.९ च्या विस्तारित कामाच्या निम्नतम निविदेस मंजूरी देण्याबाबत.

--------------------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.३९१ ते ३९५ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र) यांनी असे प्रतिपादन केले की, हया योजनेमध्ये एकूण ३२ गाळे बांधण्यात येणार असून हे सर्व गाळे अतिरिक्त उपलब्ध होणार आहेत. हया कामाची निविदा रक्कम रु. ७९,४१, २९४/- असून मे. इंडियन कन्स्ट्रक्शन कं. हयांची ९.५० टक्के अधिक दराची निविदा निम्नतम आहे. हया ठेकेदाराने पूर्वी केलेली कामे समाधानकारक असल्याने त्याची निम्नतम निविदा मंजूर करण्यासाठी सदर प्रस्ताव सादर केला आहे.

सविस्तर चर्चेअंती मे. इंडियन कन्स्ट्रक्शन कं. हयांची ९.५० टक्के अधिक दराची निम्नतम निविदा मंजूर करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ९९/८०९**

इ.क्र.१६ जी ते के, नौशिर भरुचा मार्ग हया संयुक्त पुनर्बांधणी योजनेतील इ.क्र.९ च्या विस्तारित कामाची मे. इंडियन कन्स्ट्रक्शन कं. हयांची ९.५० टक्के अधिक दराची निम्नतम निविदा स्विकृत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. बैठकीच्या कार्यवृत्तांतात स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही सुरु करण्यासही सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

-------------------------------ऋऋऋऋऋ-------------------------------

<u>बाब क्रमांक : ९९.६ (क)</u>

विषय- इ.क्र.८९-९-९३-९५-९७, भाऊसाहेब सुर्वे मार्ग व इ.क्र.५२, उमरखाडी, १ली लेन, ब. विभाग, मुंबई हया इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस पुनर्सुधारित प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.

---

सदर प्रस्ताव पृ.क्र.३९७ ते ४२१ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र) यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या दि. ९.२.९६ रोजीच्या बैठकीत हया संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या रु. १५७३८१६४/- रक्कमेस सुधारित प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली. हया संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या कामाच्या निविदा नुकत्याच मंजूर करण्यात आल्या असून काम नुकतेच सुरु करण्यात आले आहे. जून्या ६८ निवासी + १२८ अनिवासी = ८० गाळयांऐवजी नवीन बांधल्या जाणा-या इमारतीत ८६ निवासी + १२ अनिवासी = ९८ गाळे बांधले जाणार असून १८ गाळे अतिरिक्त उपलब्ध होणार आहेत. हया योजनेचा अंदाजित खर्च रु. २,६९,८७,०७३/- असून तो मंजूर सुधारित प्रशासकीय मंजूरीपेक्षा अधिक असल्याने त्यास मंडळाची पुनर्सुधारित प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर पुनर्बांधणी योजनेस पुनर्सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ९९/८१०**

इ.क्र.८९-९-९३-९५-९७, भाऊसाहेब सुर्वे मार्ग व इ.क्र.५२, उमरखाडी, १ली लेन, ब. विभाग, मुंबई हया इमारतींच्या संयक्त पुनर्बांधणी योजनेच्या रु. २,६९,८७,०७३/- खर्चास पुनर्सुधारित प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

oxoxoxoxoxo

<u>बाब क्रमांक : ९९/७</u>

विषय- **मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी ठेवावयाचे विषय**

१) विषय- करीरोड येथील १३१ अ,ब, क, खोजा चाळ हया इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेसाठी प्राप्त झालेल्या निविदांवर निर्णय घेणेबाबत.

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये पटलावर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी असे प्रतिपादन केले की, हया योजनेचा भूखंड रिक्त आहे. हया इमारतीच्या पुनर्बांधणी कामाच्या रु. १,५१,१७,९४९/- रक्कमेच्या निविदा प्राप्त झाल्या असून मे.सी.बी.ॲन्ड सन्स हयांची ९.९९ टक्के अधिक दराची निविदा निम्नतम आहे. जून्या इमारतीतील ५२ निवासी गाळयांऐवजी नवीन बांधल्या जाणा-या इमारतीत ५६ निवासी गाळे बांधले जाणार आहे. एकूण ४ गाळे अतिरिक्त उपलब्ध होणार आहेत.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने अशा सूचना केल्या की, हया भागात आपण " साई सदन" सारख्या ब-याच इमारती पुनर्रचित केल्या आहेत. त्यामुळे ही इमारत पाहताक्षणी नजरेस भरावी हया दृष्टीने इमारतीची समोरील बाजू सुशोभित करुन बांधावी.

सविस्तर चर्चेअंती हया योजनेच्या मे.सी.बी.ॲन्ड सन्स हयांची निम्नतम निविदा मंजूर करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ९९/८११**

१३१ अ,ब, क, खोजा चाळ, करीरोड, मुंबई हया इमारतीच्या पुनर्बांधणी कामाची मे.सी.बी.ॲन्ड सन्स हयांची ९.९९ टक्के अधिक दराची निविदा निम्नतम सर्वानुमते मंजूर करण्यात आली तसेच बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही तात्काळ सुरु करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

-----------------00000-----------------

२) विषय- ' बदक चाळ ' इ.क्र.४१ बी ते ४१ एच.ई. विभाग, मुंबई हया इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेच्या निम्नतम निविदेस मंजूरी देणेबाबत.

----------------------

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये पटलावर सादर करण्यात आला आहे

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी असे प्रतिपादन केले की, हया पुनर्बांधणी कामाच्या रु. ५,४४,५२,९५६/- रक्कमेच्या निविदा प्राप्त झाल्या असून निविदा रक्कम ही जरी रु.५.०० कोटीपेक्षा अधिक असली तरी ही निविदार उणे दराने भरल्याने कामाची रक्कम रु.५.०० कोटीपेक्षा कमी होत आहे. त्यामुळे ही निविदा मंडळाच्या अधिकारात येत आहे. मे. कॅनन इंजिनियरिंग हयांची १९.०० टक्के उणे दराची निविदा निम्नतम असून सदर निविदेबाबत मंडळाने निर्णय घ्यावा.

मुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, वास्तुशास्त्रज्ञांनी हया निविदेच्या विरोधात मत दिले आहे. उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सदर ठेकेदाराने दर कमी भरलेले आहेत असे वास्तुशास्त्रज्ञंनी कळविले आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, मागच्या वेळीआपण जास्तीत जास्त किती उणे दराच्या निविदा मंजूर केल्या आहेत ? उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मागील वेळी आपण जास्तीत जास्त २२ टक्के उणे दराची निविदा मंजूर केली आहे. पटेल बिल्डिंगच्या पुनर्बांधणी कामाची निविदा १३.५० टक्के उणे दराने प्राधिकरण स्तरावर मंजूर केली आहे. उमरखाडी येथील पुनर्बांधणी कामाची निविदा २० टक्के उणे दराने मंजूर केली असून कामाठीपूरा येथील पुनर्बांधणी कामाची निविदा २२ टक्के उणे दराने मंजूर केली आहे.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पटेल बिल्डिंगच्या पुनर्बांधणी कामाची निविदा १३.५० टक्के उणे दराने मंजूर करताना आपण रहिवाशांना त्याबाबत पूर्ण कल्पना दिली होती. संबंधित ठेकेदारांबरोबर रहिवाशांची चर्चा घडवून आणून कामाचा दर्जा चांगला रहावा म्हणून रहिवाशांतर्फे त्यांच्या वास्तुशास्त्रज्ञांची नेमणूक करण्यास सांगितले होते. त्यामुळे पटेल बिल्डिंगच्या पुनर्बांधणी कामाचा दर्जा चांगला राखला गेलेला आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पटेल बिल्डिंगच्याच ठेकेदाराची ही निविदा असून त्याबाबत रहिवाशांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करण्यात येईल.

मा. सभापती हयांनी तदनुषंगाने असे सुचविले की, हया निविदेबाबत रहिवाशांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करण्याच्या अटीवर ही निविदा मंजूर करावी. रहिवाशांच्या चर्चेतील कार्यवृत्तांतानुसार ही निविदा मंजूर केल्याचे कागदोपत्री ठेवावे व तदनंतरच पुढील कार्यवाही करावी. तदनुसार ही निविदा मंजूर करण्याचे सर्वानुमते सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ९९/८१२**

इ.क्र.४१ बी ते ४१ एच, बदक चाळ, ई. विभाग, मुंबई हया इमारतीच्या पुनर्बांधणी कामाची मे. कॅनन इंजिनियरिंग हयांची १९.०० टक्के उणे दराची निम्नतम निविदा हया इमारतीतील रहिवाशांबरोबर चर्चा करुन मंजूर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली तसेच रहिवाशांबरोबरील चर्चेच्या कार्यवृत्तांतानुसार पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---ooo---

३) विषय- इ.क्र.१एफ, १जी, १ आर, ५, ७ आणि ९, गनपावडर रोड, ई. विभाग, म्हाड अधिनियमातील कलम ८८ (३) (ब) अन्वये घोषित करण्याकरिता मंजूरी देणेबाबत.

---

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये पटलावर सादर करण्यात आला आहे

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी असे प्रतिपादन केले की, जून्या ७-८ इमारतींची संयुक्त पुनर्बांधणी योजना प्रस्तावित केली असून ४ इमारतींना कलम ८८ (३) (अ) प्रमाणपत्र जारी करण्यात आले आहे परंतु उर्वरित इमारती कलम ८८ (३) (अ) प्रमाणपत्राखाली घोषित करु शकत नाही. मात्र हया तीन इमारतींचा समावेश संयुक्त पुनर्बांधणी योजनेमध्ये केल्याशिवाय हया सर्व इमारतींची पुनर्बांधणी करता येणार नाही. त्यामुळे हया ३ इमारतींना कलम ८८ (३) (ब) प्रमाणपत्र जारी करण्याचा प्रस्ताव असून त्यास मंडळाची मंजूरी आवश्यक आहे. मंडळाच्या मंजूरीनंतर भूसंपादनाचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी सादर केला जाईल.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने विचारणा केल्यानुसार का.अ./पु.वि.२ यांनी असे प्रतिपादन केले की, चार इमारतीतील रहिवाशी सद्यः मंडळाच्या संक्रमण शिबीरात रहात आहेत तसेच हया उर्वरित ३ इमारतीतील रहिवाशी पुनर्बांधणी योजनेस तयार आहेत.

सविस्तर चर्चेअंती हया इमारतींना कलम ८८ (३) (ब) प्रमाणपत्र जारी करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ९९/८१३**

इ.क्र.१एफ, १जी, १ आर, ५, ७ आणि ९, गनपावडर रोड, ई. विभाग हया इमारतींना म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३) (ब) नुसार प्रमाणपत्र जारी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

---oxoxoxo---

४) विषय- इ.क्र.२६०,डी, जगन्नाथ शंकरशेठ मार्ग, मुंबई हया इमारतीतील दहा रहिवाशांच्या गाळयांच्या क्षेत्रफळात सुधारणा करण्याबाबत.

---

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये पटलावर सादर करण्यात आला आहे

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द.) यांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीस ८८ (३) (अ) प्रमाणपत्र जारी करण्यास मंडळाच्या दि. ७.४.२००३ रोजीच्या बैठकीत

मंजूरी देण्यात आली आहे. तदनंतर हया इमारतीतील इमारतीच्या कोप-याच्या भागात राहणा-या रहिवाशांनी त्यांच्या गाळयांचे क्षेत्रफळ चुकीचे दाखविल्याने ते सुधारित करण्याची विनंती केली आहे. हया प्रकरणाबाबत मंडळाच्या मागील बैठकीत ठरल्यानुसार मंडळाच्या दोन सन्मा. सदस्यांनी (श्री. विश्वास मोकाशी व श्री. बाप्पा सावंत) हया इमारतीची पाहणी केली आहे. हे १० गाळेधारक सामाईक छन्न मार्गातील भागाचा वापर स्वतंत्रारित्या फार पूर्वीपासून करीत आहेत व त्यामुळे हया सामाईक छन्न मार्गातील भागाचे क्षेत्रफळ त्यांच्या गाळयांच्या क्षेत्रफळामध्ये अंतर्भूत करावे अशी त्यांची मागणी आहे.

कार्यकारी अभियंता (डी-१) विभाग यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या दुरुस्तीचा नकाशा तयार करताना हया १० गाळयांच्या क्षेत्रफळामध्ये सामाईक छन्न मार्गातील भागाचे क्षेत्रफळ समाविष्ट केलेले नव्हते व त्यानुसारच ८८ (३) (अ) प्रमाणपत्र प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. तदनंतर हया रहिवाशांना जागा खाली करण्याच्या सूचना दिल्यानंतर त्यांनी त्यांच्या गाळयांचे क्षेत्रफळ व्हेकेशन नोटीसमध्ये कमी दाखविल्याने ते सुधारित करण्याची विनंती केली आहे. गेल्या ४० वर्षांपासून हे गाळेधारक सामाईक छन्न मार्गातील भागाचा स्वतंत्रपणे वापर करीत आहेत. रहिवाशांची ही मागणी मान्य न केल्यास पुनर्बांधणी योजनेत अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. कदाचित हे गाळेधारक सदर प्रकरण न्यायालयातही दाखल करतील व गाळे खाली करणार नाहीत. अशा परिस्थितीत रहिवाशांची मागणी मान्य करणे पुनर्बांधणी ~~पुनर्बांधणी~~ योजनेच्या दृष्टीने हिताचे आहे. हया बाबीस इमारतीतील इतर रहिवाशांचाही विरोध नाही. सन्मा. सदस्यांनीही हया इमारतीची पाहणी केली असून वस्तुस्थितीची खात्री करुन घेतली आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावात सादर केल्यानुसार १० गाळेधारकांच्या गाळयांच्या सुधारित क्षेत्रफळास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ९९/८१४**

उपमुख्य अभियंता (द.) यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे इ.क्र.२६०,डी, जगन्नाथ शंकरशेठ मार्ग, मुंबई हया इमारतीतील १० गाळेधारकांच्या सुधारित क्षेत्रफळास प्रस्तावात सादर केल्यानुसार सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

-----------------------------□□□□-----------------------

५) विषय- मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरिता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे प्रस्ताव.

..........................

मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुर्नविकासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे खालील २९ प्रस्ताव पटलावर मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

१) अंतिम भूखंड क्र.१८६७,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-४८३९ (४),इ.क्र.२४१,केसूळकर रोड नं.१, (कॅडेल रोड), माहिम, मुंबई येथील " तिकोना बिल्डिंग" नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२) भुकर पहाणी क्र.२७०, ताडदेव विभाग, विभाग क्र.डी-४२६९ व ४२६७-६८, इ.क्र.१२८-१३० व १३०-१३४, डॉ.डी.बी.मार्ग, मुंबई येथील ' झीनाब मंझील ' नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

३) भुकर पहाणी क्र.८२६, लोअर परेल विभाग, विभाग क्र.जीएस- २४६७ (१- १अे) व २५३३(२), इ.क्र.३५-३५सी, ३७-३७डी, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई येथील "सागर मॅन्शन" नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

४) भुकर पहाणी क्र.७२१/१० माटुंगा विभाग, भूखंड क्र.५८६-ए, दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र. एफ.एन.७०२२(३), इ.क्र.२०, लेडी जहांगीर रोड, माटुंगा,मुंबई येथील " जयेंद्र पार्क" नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

५) अंतिम भूखंड क्र.१०३ व १०४ नगररचना योजना क्र. ४, माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-४१८४ (१) ४१८४ (३), ४१८४ (५), ४१८५ (१), ४१८५ (२), ४१८४ (३ए) ४१८५ (३) ४१८५ (५) ४१८४ (५ए) इ.क्र.२९२-२९२ए, २९४ए, २८८ए, २९०, २९३, ५, ५ए, ७ए, ७बी, गणेश पेठ लेन, ३०४-३०६-३०८-३१०-३१२, ३०४ए व २९८-२९८ ए, ३००-३००ए, ३०२-३०२ए, एल.जे.रोड, दादर, मुंबई हया मालमत्तांच्या संयुक्त पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

६) अंतिम भूखंड क्र.१०७, नगररचना योजना क्र.२,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-४७९६(१), ४७९६(२), ४७९६(३), ४७९६(५ए), ४७९६(६) व ४७९६(७), इ.क्र.१२५, १२५ डी डी, १३२, १३२ए, १३६-१३८,एल.जे.रोड, माहीम, मुंबई येथील "पार्वती वाडी " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

७) भूकर पाहणी क्र.१/४७, २/४८, ११७, ११८,११९,१२० व १२१लोअर परेल विभाग, विभाग क्र. जीएन-७८(३), ७८(२), ७९ (२ए), ७९ (२बी), ७९ (२सी), ७९ (२डी), ७९ (ई) व ७९

(जी),इ.क्र. ७८ बी, ६९-७३ए, ६७बी, ६७सी, ६७डी, ६७एफ, ६५ बी व ६७, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई येथील " फटाकडावाला चाळ " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

८) भुकर पहाणी क्र.१५५० व १५५१, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-३८६६ व ३८६७(१), इ.क्र.४३ व ४५-४५ए-४५बी, मोहमोडन स्ट्रीट, भायखळा,मुंबई येथील "अब्बास मंझील व मोहम्मदी मंझील" नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

९) भुकर पहाणी क्र.१०५७ गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-२००३ (३), इ.क्र.९,खेतवाडी ९वी गल्ली,गिरगाव,मुंबई येथील "किल्ली निवास" नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

१०) भूकर पाहणी क्र.२११, कुलाबा विभाग, उपकर क्र. ए-३५८(१) व ७५६ ,इ.क्र.६७,शहीद भगतसिंग रोड, १४, होरमासजी स्ट्रीट, कुलाबा, मुंबई येथील " नाना हाऊस" नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

११) भुकर पहाणी क्र.६४३, गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-१५९० (२), इ.क्र.८, डॉ. देशमुख रोड, गिरगाव, मुंबई येथील "फर्नांडीस बिल्डिंग" नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

१२) भुकर पहाणी क्र.३५१, ताडदेव विभाग, विभाग क्र.डी-३८४६ (८) इ.क्र.१८,वाडीया स्ट्रीट, ताडदेव, मुंबई येथील ' नवाब मंझील ' नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१३) भुकर पहाणी क्र.१८२३,मांडवी विभाग, विभाग क्र. बी-२९५० (१),इ.क्र.८, निशानपाडा रोड, मुंबई येथील " रुबी बिल्डिंग " हया मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

१४) अंतिम भूखंड क्र.१४९, नगररचना योजना क्र.४, माहिम विभाग, विभाग क्र. क्र. जीएन-४२२२ (३) इ.क्र.१७-ए, डी.एल.वैद्य रोड,दादर, मुंबई येथील गणेश बिल्डिंग नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

१५) भुकर पहाणी क्र.२१३/१० माटुंगा विभाग, भूखंड क्र.२७८,दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र. एफ.एन.७४८७ (३), इ.क्र.२२, देवधर रोड, माटुंगा,मुंबई येथील " गंगा निवास" नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

भुकर पहाणी क्र.१/३४९, ताडदेव विभाग, विभाग क्र.डी-३८८३ (१)

१६) ३८८३ (१ए) व ३८८३ (१बी), इ.क्र.५०८एल, ५०८के व ५१० ऑर्थर रोड (साने गुरुजी मार्ग)ताडदेव, मुंबई येथील 'गांजावाला बंगला व चाळ ' नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१७) भुकर पहाणी क्र.२०/२६,दादर-नायगाव विभाग, भूखंड क्र.२, नायगाव इस्टेट, विभाग क्र. एफ.एस.६४९ , इ.क्र.५६-५६जी, नायगाव रोड, (२३३-२४१, डॉ.बी.ए.रोड ), परेल,मुंबई येथील " सोपारीवाला बिल्डिंग " नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

१८) भुकर पहाणी क्र.६५४ गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-१५९२ (५), इ.क्र.१५-१७, डॉ. देशमुख लेन ,गिरगाव, मुंबई येथील "अमीचंद मेन्शन" नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

१९) भुकर पहाणी क्र., ३१६७, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-५६०० इ.क्र.४४-५२, तिसरी पांजरपोळ लेन, मुंबई येथील ' मणियार भवन ' नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

२०) भुकर पहाणी क्र.४/१७६४, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-३९२३ (१), इ.क्र.१७-१७ए, १७बी,बदलू रंगारी स्ट्रीट, भायखळा,मुंबई येथील "हाजी उमर नथू चाळ " नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२१) भुकर पहाणी क्र.६३९ (भाग), गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-१५९५(३), इ.क्र.१३४, आय, व्ही.पी. रोड, गिरगाव,मुंबई येथील "गणेशकृपा सह.गृ.नि.संस्था " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२२) अंतिम भूखंड क्र.८०,नगररचना योजना क्र.३,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-४१२३ (२ए),इ.क्र.९,सखाराम किर रोड, माहिम, मुंबई येथील " सिताराम भुवन" नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२३) भुकर पहाणी क्र.६१२ ए /१० माटुंगा विभाग, भूखंड क्र.६०७,सी, दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र. एफ.एन.७१५४ (१), ७१५४ (३) इ.क्र.२२ व २२बी, खारेघाट रोड, दादर, (पू) मुंबई येथील " समई" नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२४) भुकर पहाणी क्र.३१८,गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-५९-६१, इ.क्र.१५६-१५८-१६०, ठाकूरव्दार रोड, ६१-६९, पंडीत भास्कर बुवा बोखले मार्ग ) मुंबई येथील " भाद्रण हाऊस " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२५) भुकर पहाणी क्र.४९/१०, माटुंगा विभाग, विभाग क्र.एफएन-६७५५ (१), इ.क्र.१-३ व्हिन्सेंट रोड, एल.टी. कॉलनी, दादर, मुंबई येथील " लक्ष्मीकृपा " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२६) भुकर पहाणी क्र.६३/१० माटुंगा विभाग, भूखंड क्र. एफ.एन.६५, दादर माटुंगा इस्टेट,(द.),एफएन-७२४६ (२) इ.क्र.८,डी.व्ही.प्रधान रोड, दादर,मुंबई येथील " रामश्री बिल्डिंग" नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२७) भुकर पहाणी क्र.१/३६४, ताडदेव विभाग, विभाग क्र.डी-३८०८ (१) इ.क्र.१३९,ताडदेव रोड,मुंबई येथील ' मिनू लॉज ' नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

२८) भुकर पहाणी क्र.६६०,परेल शिवडी विभाग, विभाग क्र.एफएस-२५२७ (१), २५२७ (४), २५२७ (४ए), २५२७ (४बी), २५२७ (५), इ.क्र. १२२१,१२२१ सी, १२२१ डी, १२२१ सीसी, १२२१ ई, जी.डी. आंबेकर मार्ग, मुंबई येथील " रायबहादूर बागला चाळ " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

२९) भुकर पहाणी क्र.१५३ व १५४, ताडदेव विभाग, विभाग क्र.डी-४३१७ (१) ४३१८, ४३१९, ४३२२,४३२०,४३२३-२४,४३७४, ४३७५ (२) ४३७५ (१) ४३१०-१६(१), ४३१६ (२) इ.क्र.४०, ६४, ५२बी, ५२ए, ५२डी, ५२ एफ, ६६-७२, ७२बी-डी, ७२सी, ७२ई, फॉकलंड रोड, ३-५सी, ७-१७ एबी, ३९ए, बाळाराम स्ट्रीट, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, हया सर्व प्रस्तावांमध्ये ७० टक्क्यापेक्षा अधिक रहिवाशांची संमती असून विभागीय कार्यालयाने इमारतीतील रहिवाशांची यादी, त्यांच्या जवळचे क्षेत्रफळ, अपरिवर्तनीय संमतीपत्रे प्रत्यक्ष जागेवर तपासून प्रमाणित केलेली आहेत. हया प्रस्तावांमध्ये प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास हरकत नसावी.

मा. सभापती यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या दि. २२.१.२००४ रोजी झालेल्या बैठकीत भूकर पाहणी क्र.२०९ परेल शिवडी विभाग, ठाकरशी जिवराज रोड, मुंबई येथील " राघवजी सोनपाल कंपाउंड " म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यास मंजूरी देण्यात आली होती. परंतु हयाबाबत असे निदर्शनास आले आहे की, ही मालमत्ता धर्मादाय संस्थेच्या मालकीची आहे. त्यामुळे अद्याप जर हया मालमत्तेस ना.ह.प्र.पत्र दिले

नसेल तर हयाप्रकरणी धर्मादाय आयुक्तांची परवानगी घेतली नसल्याने " ना.ह.प्र. पत्र " स्थगित करावे व धर्मादाय आयुक्तांची परवानगी प्राप्त झाल्यानंतर प्रस्ताव पुनश्च मंडळाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात यावा.

वरील सविस्तर चर्चेअंती वरील २९ प्रस्तावांमध्ये प्रस्तावत नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना.ह.प्र.पत्र प्रदान करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

<u>ठराव क्रमांक : ९९ / ८१५</u>

**मुंबई बेटावरील खालील उपकरप्राप्त इमारतींच्या पुर्नविकासाठी प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.**

१) अंतिम भूखंड क्र.१८६७,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-४८३९ (४),इ.क्र.२४१,केसूळकर रोड नं.१, (कॅडेल रोड), माहिम, मुंबई येथील " तिकोना बिल्डिंग"

२) भुकर पहाणी क्र.२७०, ताडदेव विभाग, विभाग क्र.डी-४२६९ व ४२६७-६८, इ.क्र.१२८-१३० व १३०-१३४, डॉ.डी.बी.मार्ग, मुंबई येथील ' झीनाब मंझील '.

३) भुकर पहाणी क्र.८२६, लोअर परेल विभाग, विभाग क्र.जीएस- २४६७ (१- १अे) व २५३३(२), इ.क्र.३५-३५सी, ३७-३७डी, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई येथील "सागर मॅन्शन"

४) भुकर पहाणी क्र.७२१/१० माटुंगा विभाग, भूखंड क्र.५८६-ए, दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र. एफ.एन.७०२२(३), इ.क्र.२०, लेडी जहांगीर रोड, माटुंगा,मुंबई येथील " जयेंद्र पार्क".

५) अंतिम भूखंड क्र.१०३ व १०४ नगररचना योजना क्र. ४, माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-४१८४ (१) ४१८४ (३), ४१८४ (५), ४१८५ (१), ४१८५ (२), ४१८४ (३ए) ४१८५ (३) ४१८५ (५) ४१८४ (५ए) इ.क्र.२९२-२९२ए, २९४ए, २८८ए, २९०, २९३, ५, ५ए, ७ए, ७बी, गणेश पेठ लेन, ३०४-३०६-३०८-३१०-३१२, ३०४ए व २९८-२९८ ए, ३००-३००ए, ३०२-३०२ए, एल.जे.रोड, दादर, मुंबई

६) अंतिम भूखंड क्र.१०७, नगररचना योजना क्र.२,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-४७९६(१), ४७९६(२), ४७९६(३), ४७९६(५ए), ४७९६(६) व ४७९६(७), इ.क्र.१२५, १२५ डी डी, १३२, १३२ए, १३६-१३८,एल.जे.रोड, माहीम, मुंबई येथील "पार्वती वाडी ".

७) भूकर पाहणी क्र.१/४७, २/४८, ११७, ११८,११९,१२० व १२१लोअर परेल विभाग, विभाग क्र. जीएन-७८(३), ७८(२), ७९ (२ए), ७९ (२बी), ७९ (२सी), ७९ (२डी), ७९ (ई) व ७९ (जी),इ.क्र. ७८ बी, ६९-७३ए, ६७बी, ६७सी, ६७डी, ६७एफ, ६५ बी व ६७, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई येथील " फटाकडावाला चाळ "

८) भुकर पहाणी क्र.१५५० व १५५१, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-३८६६ व ३८६७(१), इ.क्र.४३ व ४५-४५ए-४५बी, मोहमोडन स्ट्रीट, भायखळा,मुंबई येथील "अब्बास मंझील व मोहम्मदी मंझील"

९) भुकर पहाणी क्र.१०५७ गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-२००३ (३), इ.क्र.९,खेतवाडी ९वी गल्ली,गिरगाव,मुंबई येथील "किल्ली निवास"

१०) भूकर पाहणी क्र.२११, कुलाबा विभाग, उपकर क्र. ए-३५८(१) व ७५६ ,इ.क्र.६७,शहीद भगतसिंग रोड, १४, होरमासजी स्ट्रीट, कुलाबा, मुंबई येथील " नाना हाऊस" .

११) भुकर पहाणी क्र.६४३, गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-१५९० (२), इ.क्र.८, डॉ. देशमुख रोड, गिरगाव, मुंबई येथील "फर्नांडीस बिल्डिंग".

१२) भुकर पहाणी क्र.३५१, ताडदेव विभाग, विभाग क्र.डी-३८४६ (८) इ.क्र.१८,वाडीया स्ट्रीट, ताडदेव, मुंबई येथील ' नवाब मंझील '

१३) भुकर पहाणी क्र.१८२३,मांडवी विभाग, विभाग क्र. बी-२९५० (१),इ.क्र.८, निशानपाडा रोड, मुंबई येथील " रुबी बिल्डिंग "

१४) अंतिम भूखंड क्र.१४९, नगररचना योजना क्र.४, माहिम विभाग, विभाग क्र. क्र. जीएन-४२२२ (३) इ.क्र.१७-ए, डी.एल.वैद्य रोड,दादर, मुंबई येथील " गणेश बिल्डिंग "

१५) भुकर पहाणी क्र.२१३/१० माटुंगा विभाग, भूखंड क्र.२७८,दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र. एफ.एन.७४८७ (३), इ.क्र.२२, देवधर रोड, माटुंगा,मुंबई येथील " गंगा निवास"

१६) .भुकर पहाणी क्र.१/३४९, ताडदेव विभाग, विभाग क्र.डी-३८८३ (१)३८८३ (१ए) व ३८८३ (१बी), इ.क्र.५०८एल, ५०८के व ५१० ऑर्थर रोड (साने गुरुजी मार्ग) ताडदेव, मुंबई येथील 'गांजावाला बंगला व चाळ' .

१७) भुकर पहाणी क्र.२०/२६,दादर-नाय्ंगाव विभाग, भूखंड क्र.२, नायगाव इस्टेट, विभाग क्र. एफ.एस.६४९ , इ.क्र.५६-५६जी, नायगाव रोड, (२३३-२४१, डॉ.बी.ए.रोड ), परेल,मुंबई येथील " सोपारीवाला बिल्डिंग "

१८) भुकर पहाणी क्र.६५४ गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-१५९२ (५), इ.क्र.१५-१७, डॉ. देशमुख लेन ,गिरगाव, मुंबई येथील "अमीचंद मेन्शन"

१९) भुकर पहाणी क्र., ३१६७, भुलेश्वर विभाग, विभाग क्र.सी-५६०० इ.क्र.४४-५२, तिसरी पांजरपोळ लेन, मुंबई येथील ' मणियार भवन '.

२०) भुकर पहाणी क्र.४/१७६४, भायखळा विभाग, विभाग क्र.ई-३९२३ (१), इ.क्र.१७-१७ए, १७बी,बदलू रंगारी स्ट्रीट, भायखळा,मुंबई येथील "हाजी उमर नथू चाळ" .

२१) भुकर पहाणी क्र.६३९ (भाग), गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-१५९५(३), इ.क्र.१३४, आय, व्ही.पी. रोड, गिरगाव,मुंबई येथील "गणेशकृपा सह.गृ.नि.संस्था "

२२) अंतिम भूखंड क्र.८०,नगररचना योजना क्र.३,माहीम विभाग, विभाग क्र. जीएन-४१२३ (२ए),इ.क्र.९,सखाराम किर रोड, माहिम, मुंबई येथील " सिताराम भुवन" .

२३) भुकर पहाणी क्र.६१२ ए /१० माटुंगा विभाग, भूखंड क्र.६०७,सी, दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र. एफ.एन.७१५४ (१), ७१५४ (३) इ.क्र.२२ व २२बी, खारेघाट रोड, दादर, (पू) मुंबई येथील " समई"

२४) भुकर पहाणी क्र.३१८,गिरगाव विभाग, विभाग क्र.डी-५९-६१, इ.क्र.१५६-१५८-१६०, ठाकूरव्दार रोड, ६१-६९, पंडीत भास्कर बुवा बोखले मार्ग ) मुंबई येथील " भाद्रण हाऊस "

२५) भुकर पहाणी क्र.४९/१०, माटुंगा विभाग, विभाग क्र.एफएन-६७५५ (१), इ.क्र.१-३ व्हिन्सेंट रोड, एल.टी. कॉलनी, दादर, मुंबई येथील " लक्ष्मीकृपा " नावाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत.

२६) भुकर पहाणी क्र.६३/१० माटुंगा विभाग, भूखंड क्र. एफ.एन.६५, दादर माटुंगा इस्टेट,(द.),एफएन-७२४६ (२) इ.क्र.८,डी.व्ही.प्रधान रोड, दादर,मुंबई येथील " रामश्री बिल्डिंग"

२७) भुकर पहाणी क्र.१/३६४, ताडदेव विभाग, विभाग क्र.डी-३८०८ (१) इ.क्र.१३९,ताडदेव रोड,मुंबई येथील ' मिनू लॉज '

२८) भुकर पहाणी क्र.६६०,परेल शिवडी विभाग, विभाग क्र.एफएस-२५२७ (१), २५२७ (४), २५२७ (४ए), २५२७ (४बी), २५२७ (५), इ.क्र. १२२१,१२२१ सी, १२२१ डी, १२२१ सीसी, १२२१ ई, जी.डी. आंबेकर मार्ग, मुंबई येथील " रायबहादूर बागला चाळ ".

२९) भुकर पहाणी क्र.१५३ व १५४, ताडदेव विभाग, विभाग क्र.डी-४३१७ (१) ४३१८, ४३१९, ४३२२,४३२०,४३२३-२४,४३७४, ४३७५ (२) ४३७५ (१) ४३१०-१६(१), ४३१६ (२) इ.क्र.४०, ६४, ५२बी, ५२ए, ५२डी, ५२ एफ, ६६-७२, ७२बी-डी, ७२सी, ७२ई, फॉकलंड रोड, ३-५सी, ७-१७ एबी, ३९ए, बाळाराम स्ट्रीट, मुंबई

------------oo---------------

६) विषय- इ.क्र.७१४ अ, बापूराव जगताप मार्ग, ई. विभाग, भायखळा, मुंबई हया इमारतीस म्हाड अधिनियमातील कलम ८८ (३)(ब) चे प्रमाणपत्र देण्याचा प्रस्ताव.

--------------------------------

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये पटलावर सादर करण्यात आला आहे

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी असे प्रतिपादन केले की, इ.क्र. ७१६-७४४, ७१४ए हया इमारतींची संयुक्त पुनर्बांधणी योजना मंडळाने हाती घेतली आहे. इ.क्र.७१४ ए ही इ.क्र.७१६-७४४ च्या मागील बाजूस असल्याने भविष्यात हया इमारतीची स्वतंत्र पुनर्रचना योजना राबविणे शक्य नाही. त्यामुळे ही इमारत इ.क्र.७१६-७४४ सह संयुक्त पुनर्बांधणी योजनेत समाविष्ट केली आहे. हया इमारतीस म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३)(ब) नुसार प्रमाणपत्र जारी करणे आवश्यक असून त्यास मंडळाची मंजूरी आवश्यक आहे.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबत मा. अध्यक्ष/प्राधिकरण हयांचयाशी चर्चा करुन नंतरच हया इमारतीस म्हाड अधिनियमातील कलम ८८ (३) (ब) नुसार प्रमाणपत्र जारी करावे हयास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक : ९९/८१६**

इ.क्र.७१४ अ, बापूराव जगताप मार्ग, भायखळा, मुंबई हया इमारतीबाबत मा. अध्यक्ष/प्राधिकरण हयांच्याशी चर्चा करुन नंतरच हया इमारतीस म्हाड अधिनियमातील कलम ८८ (३) (ब) नुसार प्रमाणपत्र जारी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

------------------------------oooo--------------------------

(७) विषय- इ.क्र. ७१६-७४४, ७१४ए , बापूराव जगताप मार्ग, ई. विभाग, भायखळा, मुंबई हया संयुक्त पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.

--------------------------------

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयामध्ये पटलावर सादर करण्यात आला आहे

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतींची संयुक्त पुनर्बांधणी योजना मंडळाने हाती घेतली आहे. महानगरपालिकेने मंजूर केलेल्या नकाशांनुसार जून्या इमारतीतील ५१ निवासी + १७ अनिवासी = ६८ गाळयांऐवजी नवीन इमारतीत १०३ निवासी + १७ अनिवासी = १२० गाळे बांधले जाणार आहेत. एकूण ५२ निवासी गाळे अतिरिक्त उपलब्ध होणार आहेत. हया योजनेसाठी रु. ५,००,५५,४०५/- खर्च अपेक्षित असून त्यास मंडळाची प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती हया योजनेस प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ९९/८१७**

इ.क्र. ७१६-७४४, ७१४ए , बापूराव जगताप मार्ग, ई. विभाग, भायखळा, मुंबई हया संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या रु. ५,००,५५,४०५/- रक्कमेच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

--------------------------------oooo--------------------------

मा. सभापती हयानी तदनंतर अशी विचारणा केली की, आता एकूण किती इमारतींची पुनर्रचना झाली आहे व ज्या इमारतींची पुनर्रचना पूर्ण झाली आहे त्या इमारती सहमुख्य अधिकारी हयांनी त्यांच्या ताब्यात घेऊन पावसाळयापूर्वी गाळे वाटपाचा कार्यक्रम मागच्याप्रमाणे मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्य मंत्री तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते मा. शरद पवार हयांना आमंत्रित करुन ठरवावयाचा झाल्यास अशा किती इमारतीतील गाळयांचे वाटप केले जाऊ शकते.

तदनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे प्रतिपादन केले की, चार इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र विद्युत पुरवठा प्राप्त झाला असून त्यांच्या गाळे वाटपाची कार्यवाही सुरु आहे. ३-५-७, भालेराव मार्ग, ३०जी, तुळशीवाडी, ८९-९१, दुर्गादेवी स्ट्रीट, ४९-५१, के.के.मार्ग व २२ इराणी चाळ हया ५ इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले असून पाणी पुरवठयाची व्यवस्था करण्याची कार्यवाही सुरु आहे. हया सर्व इमारती गाळे वाटपासाठी तयार असून गाळे वाटपाची प्रकिया पूर्ण होईपर्यंत पाणी पुरवठयाची व्यवस्था केली जाऊ शकते. १७-२७, दुसरा कोळीवाडा, पारशीवाडा, आनंदी घटा चाळ हया इमारतींच्याही पुनर्रचनेची कामे पूर्ण झाली आहेत. तदनंतर १८, त्रिभुवन रोड व ९-११, महालक्ष्मी हया इमारतींचे गाळे वाटप तात्काळ करण्याची विनंती उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) यांनी सहमुख्य अधिकारी यांना कली. हया इमारतीच्या रस्तारुंदीकरणाच्या जागेवर दुकाने असून रस्ता रुंदीकरणाची जागा म.न.पा. ला हस्तांतरित करावयाची आहे. त्यामुळे ही दुकाने नवीन पुनर्रचित इमारतीत हलविणे अत्यंत गरजेचे असून ही दुकाने स्थलांतरित केल्यानंतरच हया इमारतींस भोगवटा प्रमाणपत्र म.न.पा.कडून घेऊन उर्वरित गाळे वाटपाची प्रक्रिया सुरु करता येईल.

मा. सभापती हयानी तदनंतर असे प्रतिपादन केले की, मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्याशी झालेल्या चर्चेत ज्या इमारतींची पुनर्रचना पूर्ण झाली आहे अशा इमारत सहमुख्य अधिकारी हयांनी ताब्यात घेऊन गाळे वाटप करणे आवश्यक होते. हयाबाबत पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा मा. सभापती यांनी केली.

सहमुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, अशा एका इमारतीचा ताबा घेतल्यानंतर त्यातील ३ गाळयांमध्ये घुसखोरी झालेली आहे. हयाबाबतचे प्रकरण नुकतेच न्यायालयात दाखल झालेल आहे.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्याबरोबर झालेल्या चर्चेत हया प्रकरणाबाबत अपूरा कर्मचारीवग्र असल्याची अडचण सांगण्यात आली होती. त्यावेळी सचिव/प्राधिकरण यांनी असा निर्णय घेतला की, सार्वजनिक बांकाम विभागाच्या निकषांनुसार प्रत्येक अभियंत्यांस काम दिले जाईल.व निकषांनुसार जर एखाद्या कर्मचा-याकडे काम नसेल तर अशा कर्मचा-याची नियुक्ती ज्याठिकाणी कर्मचारीवर्ग कमी आहे अशा ठिकाणी करण्यात येईल. हयाबाबतची सद्यस्थिती काय आहे अशी विचारणा मा. सभापती यांनी केली.

सहमुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी त्यांच्या स्तरावर प्रत्येक मंडळातील रिक्त पदांचा आढावा घेतला होता तसेच १९९३ मध्ये जी पदे निश्चित केली होती अशा पदांचाही आढावा घेतला होता. याशिवाय सद्यः कामाचा भार लक्षात घेऊन किती अतिरिक्त पदे निर्माण करावी लागतील हयाबाबतही आढावा घेतला होता. हयाबाबत प्राधिकरणाच्या बैठकीतही चर्चा करण्यात आली असून संक्रमण शिबीरामध्ये प्रत्येकी १० कर्मचा-यांचे दोन नवीन् अतिरिक्त युनिटस् व पुनर्रचित गाळयांसाठी १ नवीन युनीट निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच अभियांत्रिकी विभागामध्ये कामाच्या आर्थिक निकषांनुसार नवीन युनीटस् निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. हया निकषांनुसार प्राधिकरणाकडून मंडळाला तसे आदेश प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने अशा सूचना केल्या की, हयाबाबत प्राधिकरणाकडे पाठपुरावा करण्यात यावा. तसेच प्राधिकरणाचे आदेश प्राप्त होईपर्यंत काय कार्यवाही केली जाणार आहे अशी विचारणा मा. सभापती यांनी केली.

का.अ./ पु.वि.१ यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहायक अभियंता यांना सद्यः पुनर्रचित गाळयाचा ताबा द्यावा लागतो ही वस्तुस्थिती आहे. सदर कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहायक अभियंता यांना पुनर्रचना विभागातील भूसंपादन कामांची देखरेख, न्यायालयीन प्रकरणे, म.न.पा.कडून नकाशांना मंजूरी प्राप्त करण्यासाठी पाठपुरावा करणे हया कामकाजांशिवाय इतर अनेक दैनंदिन कामे पूर्ण करावी लागतात. हया व्यतिरिक्त हया गाळयांचे वाटप, त्यांची देखरेख करणे हे अभियंता वर्गाचे काम नसतानासुध्दा ही नवीन जबाबदारी अभियंतावर्गावर टाकणे योग्य नाही.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पुनर्रचित गाळयांची देखभाल ही मंडळाला करावीच लागेल. उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पुनर्रचित गाळे विभागातील भाडेवसुलीकार दर महिन्याला भाडे वसुल करण्यासाठी जात असतात. त्यामुळे हया गाळयांचे वाटप/देखरेख संबंधित भाडेवसुलीकार करु शकतात. हे जर शक्य नसेल तर वॉच ॲन्ड वॉर्ड नेमण्याबाबत विचार होणे आवश्यक आहे. मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे

सुचविले की, ज्या ठेकेदारामार्फत इमारतीच्या पुनर्रचनेचे काम केले जाते त्याच ठेकेदाराला इमारतीची देखभाल एक वर्षासाठी करण्यास सांगावे व हयासाठी शक्य असल्यास करारपत्रातच तशी अट अंतर्भूत करावी. तसेच मा. उपाध्यक्ष/ प्राधिकरण यांनी जसा आता निर्णय घेतला आहे त्यानुसार हयासाठी वाढीव अधिकारी/कर्मचारीवर्गाची नेमणूक करावी. एक वर्षासाठी संबंधित ठेकेदारासच पुनर्रचित गाळयांची देखभाल करण्यास बांधील करावे व त्यानंतर मात्र मंडळानेच पुनर्रचित गाळयांची देखभाल करावी.

का.अ./ पु.वि.३ यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पुनर्रचित गाळयांचे वाटप आतापर्यंत अभियंतावर्गातर्फे केले जात नव्हते तसेच पुनर्रचित गाळे विभागातील अधिकारी/कर्मचारी संध्याकाळी ६.०० नंतर गाळयांचा ताबा घेण्यासाठी संबंधित रहिवाशांसह येतात. हयापेक्षा पूर्वी त्यांना ज्याप्रमाणे चावी दिली जात होती त्याचप्रमाणे आताही चावी देणे संयुक्तिक होईल असे वाटते.

सहमुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, संबंधित रहिवाशास ट्रकमध्ये सामान भरण्यास विलंब होत असल्याने ताबा घेण्यासाठी संध्याकाळी ६.०० नंतर येतात. का.अ./ फग-उ विभाग यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पुनर्रचित गाळयाचा ताबा रहिवाशास देणे हे अभियंता वर्गाचे काम नाही. हयाबाबत म्हाड अधिनियमात तशी तरतुद नाही.

सहमुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की,पुनर्रचित गाळयांची देखभाल करण्याबाबत पुनर्रचित गाळे वाटप विभागातील कर्मचारी/अधिका-यांच्याही अडचणी आहेत. त्यामुळे ठेकेदाराच्या करारपत्रामध्ये त्याबाबत अट अंतर्भूत करावी तसेच पुनर्रचित गाळयांची देखभाल करण्यासाठी स्वतंत्र एजन्सीची नेमणूक करणे आवश्यक आहे असे वाटते. पेरु चाळीच्या पुनर्रचनेच्या कामाच्या करारपत्राामध्ये ज्याप्रमाणे देखभालीबाबतची अट अंतर्भूत होती त्याचप्रमाणे इतर इमारतींच्या पुनर्रचनेच्या कामाच्या करारपत्राामध्ये अशी अट अंतर्भूत असणे आवश्यक वाटते. हयामुळे निदान एक वर्ष तरी हया गाळयांच्या देखभालीचा/सुरक्षेचा प्रश्न संपतो.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पुनर्रचित गाळयांचे वाटप ठेकेदारामार्फत केले जाणार नाही. मा. सभापती यांनी मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पुनर्रचित गाळयांचे वाटप जरी मंडळामार्फत केले जाणार असले तरी गाळयांचे वाटप होईपर्यंत त्यांचे रक्षण करण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने ठेकेदाराच्या करारपत्राामध्ये अट अंतर्भूत करुन निदान १ वर्षासाठी तरी हया गाळयांचे रक्षण करण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदारावर टाकण्यास हरकत नाही. मात्र एक वर्षाच्या कालावधीत गाळयांचे वाटप मंडळाने करणे आवश्यक आहे. मुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ठेकेदाराच्या करारपत्रामध्ये एक वर्षासाठी गाळयांचे रक्षण करण्याची अट अंतर्भूत करण्यास हरकत नसावी.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, गाळयांच्या रक्षणाबाबत उपाययोजना करण्याच्यादृष्टीने काय करता येईल हयाबाबत निर्णय घेण्यास हरकत नाही. मात्र पुनर्रचित गाळयांचा ताबा/चावी देण्याचे काम अभियंतावर्गास देणे योग्य नाही. अशी पूर्वी पध्दत नव्हती. आतापर्यंत ३० वर्षांमध्ये ४११ इमारती पुनर्रचित केल्या आहेत. त्या इमारतीतील गाळयांचा ताबा/चावी अभियंता वर्गामार्फत दिली गेलेली नाही. मा. मुख्य अधिकारी हयांच्या दि. २९.१२.२००३ रोजीच्या पत्रानुसार पुनर्रचित इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर अशा इमारती त्वरित मिळकत व्यवस्थापक (पु.गा.) हयांच्या ताब्यात देण्याचे आदेश मा. उपाध्यक्ष/ प्राधिकरण यांचे आदेश आहेत. त्यामुळे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर पुनर्रचित गाळयांचे संरक्षण हे मिळकत व्यवस्थापक (सं.गा.) यांच्यातर्फे करणे क्रमप्राप्त ठरते. हयासाठी इतर उपाययोजना करण्याबाबत मंडळाने निर्णय घ्यावा. त्यामुळे पुनर्रचित गाळयांचा ताबा / चावी अभियंता वर्गामार्फत देण्याची पध्दत त्वरित बंद करण्यात यावी अशी विनंती वरिष्ठ अभियंता हया नात्याने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी केली.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी उपस्थित केलेला मुद्दा योग्य आहे परंतु हया गाळयांच्या रक्षणाची जबाबदारी मंडळाची असल्याने ही जबाबदारी संयुक्तरित्या पार पाडली गेली आहे असे वाटते.

कार्यकारी अभियंता / फग-ऊ विभाग यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, एखाद्या इमारतीच्या पुनर्रचनेच्या कामामध्ये स्लॅब बांधण्याचे काम चालू असताना अभियंता वर्ग हजर नसल्यास हया कामाची देखरेख करण्यास मिळकत व्यवस्थापन विभागातील अधिकारी/कर्मचारीवर्गास सांगितले जात नाही. जे काम अभियंतावर्गाचे आहे हे काम अभियंतावर्गा मार्फतच केले जाते. मिळकत व्यवस्थापन विभागाशी संबंधित न्यायालयीन प्रकरणातही अभियंतावर्गास न्यायालयात जावे लागते. गाळे वाटप / चावी वाटपाचे काम हे मिळकत व्यवस्थापनाशी संबंधित असल्याने त्याची जबाबदारी अभियंता वर्गावर सोपविणे योग्य नाही.

सहमुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, न्यायालयीन प्रकरणात फक्त मिळकत व्यवस्थापनाशी संबंध असतो असे नाही. त्यामुळे न्यायालयीन प्रकरणात अभियंता वर्गास हजर रहावे लागते हे म्हणणे संयुक्तीक वाटत नाही.

कार्यकारी अभियंता / फग-ऊ विभाग यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, जर मिळकत व्यवस्थापन विभाग कार्यकारी अभियंत्यांच्या अधिपत्याखाली नेमला गेला तर गाळे वाटत / चावी वाटप किंवा तदनुषंगाने उदभवणारी न्यायालयीन प्रकरणे अभियंता वर्गामार्फत हाताळली जाऊ शकतात व त्यावर अभियंता वर्गामार्फत निश्चितच नियंत्रण ठेवले जाईल.

सहमुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हा मुद्दा गाळे वाटत / चावी देण्याचा नसून पुनर्रचित गाळयांच्या संरक्षणाचा आहे. अपु-या कर्मचारीवर्गामुळे व बहुतांश प्रकरणंमध्ये इमारतींची पाहणी अभियंता वर्गामार्फत केली जात असल्याने त्यांची मदत गाळे वाटत / चावी देताना होईल म्हणून हया कामी अभियंतावर्गाची मदत घेण्यात आली आहे. गाळे वाटत / चावी देणे हे काम अभियंतावर्गाचे नसून मिळकत व्यवस्थापन विभागाचे आहे हे मान्य आहे. परंतु पुनर्रचित गाळयांचे संरक्षण करणे हा प्रमुख मुद्दा आहे. उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पुनर्रचित गाळयांच्या संरक्षणाबाबत चर्चा करुन निर्णय घेतायेईल व त्यासाठी सविस्तर प्रस्ताव प्राधिकरणापुढे सादर करावा लागेल.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पुनर्रचित गाळयांच्या संरक्षणाबाबत नंतर चर्चा न करता आजच्या बैठकीतच चर्चा करुन निर्णय घेणे आवश्यक आहे. जो ठेकेदार दोन कोटी किंवा एक कोटी रुपयाचे काम करु शकतो तो ठेकेदार एक वर्षासाठी पुनर्रचित गाळयांच्या संरक्षणासाठी रु. ५०,०००/- खर्च करु शकतो. हयाबाबत प्राधिकरणापुढे प्रस्ताव सादर करुन निर्णय घेण्यास हरकत नाही.

कार्यकारी अभियंता / फग-ऊ विभाग यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, इमारतीच्या पुनर्रचनेचे काम पूर्ण झाल्यानंतर गाळे वाटपाचे काम एक वर्षात होतेच असे नाही. पाणीपुरवठा व भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी बराच कालावधी लागतो. ब-याचशा इमारतींबाबत दोन दोन वर्षांपासून पाणीपुरवठा किंवा भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे. उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पाणी पुरवठा प्राप्त झाल्यानंतर ठेकेदारास कार्यमुक्त करणे क्रमप्राप्त ठरते.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबत मंडळाच्या मागील बैठकीतही बरीच चर्चा झाली असून गाळे वाटपाची कार्यवाही ही इमारतीच्या पुनर्रचनेच्या कामास सुरुवात केल्यानंतर लगेच सुरु करण्याचे ठरले होते.

कार्यकारी अभियंता / पु.वि.१ विभाग यांनी याबाबत असे प्रतिपादन केले की, गाळे वाटपापूर्वी पाणी पुरवठा / भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक असल्याने गाळे वाटपाची कार्यवाही तत्पूर्वी सुरु करण्यास अडचणी उदभवतात..

सहमुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ज्या इमारतींच्या पुनर्रचनेची कामे पूर्ण झाली आहेत अशा इमारतींच्या गाळे वाटपाची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या पुनर्रचनेच्या कामात ब-याचशा सुधारणा केल्यामुळे मंडळाची कामाची प्रशंसा होऊ लागली आहे. त्यामुळे गाळे वाटपाची प्रक्रीयाही लवकरात लवकर पूर्ण करण्याच्यादृष्टीने कार्यवाही होणे आवश्यक आहे.

मा. सभापती यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, दुरुस्ती खर्चाची प्रमाणित मर्यादा रु. १०००/- प्रति चौ.मी. वरुन रु. १२००/- चौ.मी. पर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे त्यानुसार दुरुस्तीची अंदाजपत्रके तयार केली जातात किंवा कसे तसेच हया निर्णयामुळे काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या आहेत किंवा कसे अशी विचारणा मा. सभापती यांनी केली.

उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, आता जर दुरुस्तीचा खर्च रु. १२००/- चौ.मी. पर्यंत येत असेल तर रहिवाशांना रु. १०००/- ते रु. १२००/- दरम्यानची अधिकची रक्कम मंडळाकडे भरण्यासाठी कळविले जात नाही.

सचिव तथा नि.का.अ. यांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, दुरुस्तीची मर्यादा वाढविली असली तरी दुरुस्ती उपकरात वाढ केलेली नाही. त्यामुळे भविष्यात जर दुरुस्ती उपकरात वाढ झालीतर वाढीव उपकर भरण्याबाबत रहिवाशांकडून विकल्प पत्र / वचन पत्र घ्यावे किंवा कसे ?

उपमुख्य अभियंता (पुनर्र) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, दुरुस्तीची मर्यादा रु. ७५०/- वरुन रु. १०००/- प्रति चौ.मी. पर्यंत वाढविताना शासनाने दुरुस्ती उपकरात वाढ केली नव्हती तसेच त्यावेळी दुरुस्ती उपकरात वाढ झाल्यास वाढीव उपकराप्रमाणे उपकर भरण्याबाबत रहिवाशांकडून विकल्प पत्र / वचन पत्र घेण्यात आले नव्हते. मात्र म्हाड अधिनियमामधील कलम ८८ (३)(अ) मध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

सचिव तथा नि.का.अ. यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबत शासनाकडून प्राप्त झालेल्या आदेशांमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, म्हाड अधिनियमातील कलम ८८ (३)(अ) मध्ये दुरुस्ती खर्चाची प्रमाणित मर्यादा रु. १०००/- प्रति चौ.मी. ऐवजी रु. १२००/- प्रति चौ.मी. वाचण्यात यावी.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, दुरुस्ती उपकरात वाढ करण्याबाबत शासनाकडून भविष्यात आदेश प्राप्त झाल्यास त्याबाबत विचार केला जाईल. सद्यः हयाबाबत चर्चा करण्याची आवश्कता नाही.

कार्यकारी अभियंता / फग-ऊ विभाग यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, निवासी दूरध्वनीचा खर्च दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातील अधिकारी/ अभियंतावर्गास दिला जात नाही तसेच भ्रमण दूरध्वनीचा खर्चही देण्याचे मान्य करण्यात आले होते परंतु अद्याप त्याचीही अंमलबजावणी केली जात नाही. उपमुख्य अभियंता (पुनर्र) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे अधिकारी वगळून इतर मंडळातील अधिका-यांना निवासी दूरध्वनीचा खर्च दिला जातो. त्यामुळे दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातील अधिका-यांनाही निवासी दूरध्वनीचा खर्च देणे आवश्यक आहे. हयाबाबत प्राधिकरणाने काढलेल्या आदेशामध्ये चुक झाली असल्याने त्याबाबत प्राधिकरणास कळवावे लागेल.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, इतर मंडळातील अधिका-यांना जर निवासी दूरध्वनीचा खर्च दिला जात असेल तर दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातील अधिका-यांनाही निवासी दूरध्वनीचा खर्च देणे आवश्यक आहे. हयाबाबत प्राधिकरणापुढे त्वरित प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना मा.सभापती यांनी दिल्या. मुख्य अधिकारी यांनीही तदनुषंगाने प्राधिकरणास पत्र पाठविण्याच्या सूचना दिल्या.

सहमुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, त्यांनाही निवासी दूरध्वनीचा खर्च दिला जात नाही तसेच कार्यालयाने मोबाईल उपलब्ध करुन दिलेला नाही. उपमुख्य अभियंता यांची कार्यालये वातानुकूलित केली आहेत. मात्र त्यांच्या कार्यालयात वातानुकूलित यंत्रणा नाही. मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे आदेश दिले की, सहमुख्य अधिकारी यांच्या कार्यालयात वातानुकूलित यंत्रणा बसविण्याबाबत आदेश देण्यात येत आहेत. व त्यास लागणारा निधी अंदाजे रु. ४२,०००/- कार्यकारी अभियंता (विद्युत) / मुंबई मंडळ यांच्याकडे त्यांचे मागणीनुसार मुख्य लेखाधिकारी, दु.व पु.मंडळ यांनी अदा करावा व त्यांना मोबाईल फानेच्या खर्चाची प्रतिपूर्ती प्राधिकरणाच्या नियमानुसार करुन देण्यात यावी.

कार्यकारी अभियंता / फग-ऊ विभाग यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, अभियंता वर्गास वाहन व वाहनाच्या इंधनाचा खर्चही देण्याचे मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी मान्य केले आहे. मात्र त्यबाबतही अद्याप पुढील कार्यवाही झालेली नाही. का.अ./पु.वि.३ यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, त्यांच्या कार्यालयास दूरध्वनीसुध्दा देण्यात आलेला नाही.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने अशा सूचन्‍साा केल्या की, हयाबाबत प्राधिकरणाबरोबर पत्रव्यवहार करुन आवश्यक बाबींची पूर्तता करण्याबाबत कार्यवाही करावी.

मा. सभापती हयांनी बैठकीच्या शेवटी सन्मा. सदस्य ,अधिकारी/कर्मचारीवर्गाचे आभार मानून आजची बैठक संपल्याचे जाहीर केले तसेच मंडळाच्या पुढील बैठकीची वेळ व तारीख नंतर कळविण्यात येईल असे जाहीर केले.

उप मा. अभियंता

नि.का.अ./दु.व पु.

मुख्य अधिकारी,मुं.इ.दु.व पु.मंडळ

सभापती,मुं.ई.दु.व पु.मंडळ